सन २०१८-१९ मध्ये कृषी यांत्रिकीकरण उप अभियानांतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गासाठी रु.३६२.५० लक्ष निधी वितरित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः कृयायों-०६१८/प्र.क्र.२०२/१४-अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई- ४०० ०३२
तारीख: २८ मार्च, २०१९

संदर्भ :-

१) कृषी व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र.०४१८/प्र.क्र.१५५/१४-अे, दि.२७ एप्रिल, २०१८.
२) केंद्र शासनाच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाचे पत्र क्र.१३-८७/२०१६-M&T(I&P),दि. २५ मे,२०१८.
३) केंद्र शासनाच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाचे पत्र क्र.३-१/२०१५-M&T(I&P),दि. १२ जून,२०१८.
४) कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्रमांकः कृयांउ-१०१७/ प्र.क्र.६४/१७/१४-अे,दि. २७ जून, २०१८
५) केंद्र शासनाच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाचे पत्र क्र.३-१/२०१५-M&T(I&P),दि.५ जुलै,२०१८.
६) आदिवासी विकास विभागाचा शासन निर्णय क्र.बीयुडी-२०१८/प्र.क्र.११/कार्या-६, दि.७ जुलै, २०१८
७) कृषी व पदुम विभागाचा शासन निर्णय क्रमांकः कृयायों-०८१८/प्र.क्र.२०२/१८/१४-अे,दि.१८जुलै,२०१८
८) कृषी व पदुम विभागाचा शासन निर्णय क्रमांक: कृयायों-०६१८/प्र.क्र.२०२/१४-अे,दि.१९ जुलै,२०१८.
९) आदिवासी विकास विभागाचा शासन निर्णय क्र.बीयुडी-२०१८/प्र.क्र.११/कार्या-६,दि.७ ऑगस्ट, २०१८
१०) कृषी व पदुम विभागाचा शासन निर्णय क्रमांकःकृयायों-०६१८/प्र.क्र.२०२/१४-अे,दि.१४ ऑगस्ट,२०१८.
११) कृषी व पदुम विभागाचा शासन निर्णय क्रमांकः पुनर्वि-२०१८/प्र.क्र.(११२(१)/१८)/२-अे,दि.१ नोव्हें, २०१८.
१२) कृषी व पदुम विभागाचा शासन निर्णय क्रमांकः कृयायों-०८१८/प्र.क्र२४३/१४-अे,दि.१६ नोव्हेंबर,२०१८
१३) आदिवासी विकास विभागाचा शासन निर्णय क्र.बीयुडी-२०१८/प्र.क्र.११/कार्य-६,दि.२२ जानेवारी, २०१९
१४) केंद्र शासनाचे पत्र क्र.३-१/२०१५/M & T(I & P) दि.४ डिसेंबर, २०१८.
१५) कृषि संचालक (नि. व गु.नि) यांचे पत्र क्र.जा.क्र./कृयांउअ१८-१९/निधी अनु.वा/गु.नि-५/१०८/२०१९, दि.२६ मार्च, २०१९.

प्रस्तावना -

राज्यात केंद्र पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण उप-अभियान राबविण्यात येत आहे. सदर उप अभियानांतर्गत एकूण आठ घटक असून, त्यापैकी घटक क्र.३ व ४ राज्यात राबविण्यात येत आहेत. यामध्ये केंद्र व राज्य शासनाच्या निधीच्या हिश्श्याचे प्रमाण ६०:४० असे आहे.

केंद्र शासनाने संदर्भाधीन दि.४ डिसेंबर, २०१८ च्या पत्रान्वये, अनुसूचित जाती प्रवर्गासाठी दुसऱ्या हप्त्याचा रु.१५०० लक्ष निधी वितरीत केला आहे. संचालक (नि. व गु.नि.) यांच्या संदर्भाधीन दि.२६ मार्च, २०१९ च्या पत्रास अनुसरुन, सदर निधीपैकी रु.२१७.५० लक्ष व त्यास आवश्यक समरुप राज्य हिस्सा

रु.१४५ लक्ष असा एकूण रु.३६२.५० लक्ष निधी आयुक्त (कृषी) यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णयः-

१. सन २०१८-१९ या वर्षात अनुसूचित जाती प्रवर्गासाठी कृषि यांत्रिकीकरण उप अभियानांतर्गत अंमलबजावणी करण्यासाठी रु.३६२.५० लक्ष (रुपये तीन कोटी बासष्ट लाख पन्नास हजार फक्त) निधी आयुक्त, (कृषी) यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीद्वारे उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

२. सदर निधीमध्ये केंद्र व राज्य हिश्श्याचे विवरण पुढीलप्रमाणे आहे:-

(रु. लाखात)

अ. क्र.	योजनेचे नाव	अनुसूचित जाती		एकूण
		केंद्र हिस्सा (६०%)	राज्य हिस्सा (४०%)	
१.	कृषी यांत्रिकीकरण उप अभियान	२१७.५०	१४५.०	३६२.५०

३. सदर खर्च खालील लेखाशीर्षखाली फेब्रुवारी,२०१९ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सुधारीत अंदाजाद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

केंद्र	राज्य
मागणी क्रमांक:- डी-३ २४०१- पीक संवर्धन, ७८९- अनुसूचित जाती उपयोजना (००) (१३) कृषी उन्न्ती योजना- कृषी यांत्रिकीकरण उप अभियान (कें.पु.यो) (केंद्र हिस्सा-६०%) (अनुसूचित जाती उपयोजना) (२४०१A३०५), ३३ अर्थसहाय्य	मागणी क्रमांक:- डी-३ २४०१- पीक संवर्धन, ७८९- अनुसूचित जाती उपयोजना (००) (१४) कृषी उन्न्ती योजना- कृषी यांत्रिकीकरण उप अभियान (कें.पु.यो) (राज्य हिस्सा-४०%) (अनुसूचित जाती उपयोजना) (२४०१A३१४), ३३ अर्थसहाय्य

४. सदर निधी खर्च करण्यासाठी कृषि संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून, सदर निधीचे जिल्हानिहाय वितरण करण्यास त्यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. या उप अभियानाकरीता वितरीत करण्यात आलेला निधी वार्षिक कृति आराखड्यात मंजुर केलेल्या वाबींबर अनुसूचित जाती/नवबौध्द प्रवर्गातील शेतकऱ्यासाठीच खर्ची टाकावा. तसेच, अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर PFMS प्रणालीद्वारे जमा करावी.

६. सदर निधीमधून राबवावयाच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना, कृषी यांत्रिकीकरण उप अभियानाच्या मार्गदर्शक सूचना, दि.२७ एप्रिल, २०१८ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या, उन्नत शेती समृध्द शेतकरी अभियानाच्या मार्गदर्शक सूचना, केंद्र शासनाच्या दि.५ जुलै, २०१८ च्या पत्रातील सूचना, अटी व शर्तीचे तसेच दि.१८ जुलै, २०१८ च्या शासन निर्णयातील अटी/शर्ती व विहीत कार्यपद्धतीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

७. सदर शासन निर्णय सामाजिक न्याय विभागाच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२८१३२००२०८०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KIRAN N PATIL

Digitally signed by KIRAN N PATIL
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=657661007c4f6885bf8deae62f13606632589e592d8c18ceb9a49bfd30471850, postalCode=400032,
street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=64a3950913946fa68fe576faead463fd8ae1e3844a820d921b663674927a476e, ou=AGRICULTURE DEPT,
o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=KIRAN N PATIL
Date: 2019.03.28 13:23:59 +05'30'

(डॉ. किरण पाटील)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री (कृषि), मंत्रालय, मुंबई-३२
२. मा.राज्यमंत्री (कृषि),मंत्रालय, मुंबई-३२
३. सर्व सन्माननीय विधी मंडळ सदस्य, द्वारा विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. सचिव (कृषि), मंत्रालय,मुंबई-३२
५. प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६. आयुक्त (सामाजिक न्याय,) सामाजिक न्याय आयुक्तालय, पुणे.
७. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे
८. संचालक (निविष्ठा व गुण नियंत्रण), कृषि आयुक्तालय,पुणे
९. सर्व संचालक/सह संचालक, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
१०. विभागीय कृषि सह संचालक (सर्व)
११. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)
१२. महालेखापाल, महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर (लेखा परिक्षा) /(लेखा व अनुज्ञेयता)
१३. माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२
१४. नियोजन विभाग (का-१४३१) मंत्रालय, मुंबई-३२
१५. वित्त विभाग (व्यय-१ व अर्थसंकल्प - १३) मंत्रालय, मुंबई-३२
१६. मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगीसचिव
१७. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव.
१८. निवड नस्ती (कार्यासन -१४अे).